# पर्यायी शिक्षणाच्या दिशेने

आज आपण सर्वचजण, वेगवेगळ्या का होईना, पण आजच्या म्हणजे प्रचलित-परंपरागत किंवा शिक्षणशास्त्राच्या अंगाने सांगायचे तर 'वर्तनवादी' शिक्षणाविषयी असमाधानी आहोत. साहजिकच, शिक्षणामध्ये बदल करण्याचा, मूलभूत परिवर्तन करण्याचा अथवा पूर्णतः पर्यायी शिक्षणरचना उभी करण्याचा विचार दिवसेंदिवस प्रबळ होत गेला आहे.

वेगळ्या-पर्यायी शिक्षणाचा आग्रह हा जसा प्रचलित शिक्षणाच्या असमाधानातून केला जातो तसाच तो आजच्या बदलत्या परिस्थितीने, जागतिकीकरणाने, तंत्रज्ञानाच्या होत चाललेल्या तीव्र विकासाने तसेच यांतून निर्माण होणाऱ्या समाजाच्या गरजांमुळे होत आहे. (ह्या एकत्रित अशा बदलत्या परिस्थितीमुळे शिक्षणाची उद्दिष्टेच बदलली आहेत!) त्यांत पुन्हा, 'आपले राष्ट्र', 'जागतिक स्पर्धा', '२०२५ साली, जगातील सर्वात जास्त तरूणांची संख्या असणारा असा आपला देश', 'भारतीय संस्कृतीचे वेगळेपण जपण्याची भावना' आणि 'भारतातील लोकशाहीची टिकून राहिलेली व टिकवावी अशी चौकट' या आणि अशा अनेक दृढमूल संकल्पनांमुळेही शिक्षणाविषयीच्या अपेक्षांना वळण मिळत आहे. थोडक्यात असे की, पर्यायी शिक्षणाचीच रचना उभी करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे आता सार्वत्रिकरित्या स्वीकारले जात आहे.

शिक्षणात बदल करण्याची गरज निर्माण होणे वेगळे आणि तशी शक्यता असणे वेगळे. गरज आणि शक्यता या दोन्हींचा मेळ घालण्याचा योग यावा लागतो. शिक्षणात आमूलाग्र बदल व्हावेत अशी मोठी गरज आज निर्माण झाली आहे आणि त्याचवेळी, असे बदल करता येतील याची शक्यताही आज निर्माण झाली आहे, असा दुर्मिळ योग आज आला आहे, असे माझे मत आहे. हा 'क्षण' आपण दवडता कामा नये, आपण वाया घालवता कामा नये. देशामधील आर्थिक शक्ती, राजकीय इच्छाशक्ती आणि सामाजिक समंजसता यांनी विचापूर्वक एकत्र येऊन ह्या क्षणाचा लाभ उचलला पाहिजे. शिक्षणात अपेक्षित परिवर्तन केले पाहिजे.

शिक्षणात परिवर्तन करण्याची शक्यता आज निर्माण झाली आहे, ती मुख्यतः गेल्या पन्नास वर्षांमध्ये, तंत्रज्ञानात आणि शिक्षणाला पायाभूत ठरणाऱ्या शास्त्रज्ञानांत झालेल्या क्रांतिकारक बदलांमुळे. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या सुरूवातीस विकसित होत गेलेल्या मानसशास्त्रीय संशोधनांतून तत्कालीन शिक्षणशास्त्राला एक भक्कम मानसशास्त्रीय आधार प्राप्त झाला होता.

यांतून निर्माण झालेल्या शिक्षणविषयक पद्धतींना 'वर्तनवादी शिक्षणपद्धती' असे म्हणतात. विद्यार्थ्यांना 'शिकविण्या'वर भर देणारी अशी ही शिक्षणपद्धती आजही शिक्षणव्यवहारात आणि जनमानसात रूजलेली आहे. आज मात्र, शिक्षणशास्त्राला प्राप्त झालेला मानसशास्त्रीय पाया ढासळला असून त्याजागी मज्जामानसशास्त्रीय

असा नवा आधार, नवा पाया, अधिक परिणामकारक असा पर्याय उपलब्ध झाला आहे. साहजिकच त्यातून नवे पर्यायी शिक्षणशास्त्र उभे राहिले आहे. या नवीन शिक्षणशास्त्राचे मूलभूत वैशिष्ट्य असे की त्यातून निर्माण होणारा सारा शैक्षणिक व्यवहार हा 'शिकविण्या पेक्षा विद्यार्थ्यांच्या 'शिकण्यावर भर देणारा आहे. आजवरच्या 'शिक्षककेंद्री' शिक्षणव्यवहारापेक्षा 'विद्यार्थीकेंद्री' शिक्षणव्यवहारांवर भर देणारा असा हा पर्यायी शिक्षणाचा ढाचा आहे. शिक्षणव्यवहारांना शीर्षासन करायला लावणारा असा हा बदल आहे.

हा बदल आणणाऱ्या व संशोधनांवर आधारित अशा तीन घटनांचा येथे थोडक्यात उल्लेख करता

येईल.

एक म्हणजे, 'ज्ञाना'ची संकल्पनाच बदलून गेली आहे. आजवर आपण असे मानत होतो की, समाजात, विविध शास्त्रांच्या क्षेत्रांत विद्वान व संशोधक लोक ज्ञान निर्माण करतात. शिक्षकलोक यांमधील निवडक ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोचवतात, व त्यांकरवी, विद्यार्थी, हा ज्ञानाचा साठा 'प्राप्त' करतात; आता, असे मानतात की विद्यार्थी असा दुसऱ्यांकडून ज्ञान प्राप्त करीत नाही तर तो स्वतःच ज्ञानाचा निर्माता आहे. नवनव्या सततच्या अनुभवांतून विद्यार्थी, जगाचा अर्थ लावत जातात आणि त्यातून आपली आपणच ज्ञानाची रचना करतात.

दुसरे असे की, ज्याला साऱ्या शिक्षणव्यवहारांत अतोनात महत्त्व आहे ती 'बुद्धिमत्ते'ची संकल्पनाही, आता बदलली आहे. बुद्धिमत्ता ही आनुवंशिक गोष्ट असून तिचे उपजतच विषम वाटप समाजात झाले आहे. काही लोक बुद्धिमान म्हणून जन्माला येतात तर काही कमी बुद्धीचे. म्हणजे शाळा-महाविद्यालयांत काही विद्यार्थी हुशार असतात तर अन्य अनेक हुशार नसतात; काही तर चक्क ढ असतात. ही आपली आजवरची समजूत होती व आज ही बऱ्याच अंशी आहे. पण, आता ही बुद्धिमत्तेची संकल्पना बदलली आहे. बुद्धिमत्ता ही एक नसून अनेक असतात. प्रत्येकाच्याच वाटयाला हा विविध बुद्धिमत्तांचा पट आलेला असतो. पण प्रत्येकाचा पट वेगळाही असतो. वेगवेगळया बुद्धिमत्तांचे प्रमाण वेगवेगळे असते. बुद्धिमत्ता केवळ अनुवंशाने नव्हे तर त्या बहुतांशी वातावरणातील संधींतून विकास पावतात; त्या वाढू शकतात. शाळेत सर्वच मुले बुद्धिमान-हुशार असतात, फक्त प्रत्येकाची बुद्धिमत्ता वेगवेगळया प्रकारची असते. प्रत्येकाची हुशारी भिन्न क्षेत्रांतील असू शकते.

तिसरी महत्त्वाची घटना ही गेल्या तीस वर्षांमध्ये वेगाने होत गेलेल्या मेंदूसंशोधनाशी संबंधित आहे. विसाव्या शतकाचे अखेरचे दशक हे जसे जागतिकीकरणासाठी प्रसिद्ध होते तसेच ते 'मेंदूसंशोधनाचे दशक' म्हणूनही ओळखले जाते. मानवी मेंदू असतो कसा, तो काम करतो कसा आणि तो शिकतो कसा हे आता बऱ्यापैकी समजू लागले आहे. मेंदू हा माणसाचा 'शिकण्याचा अवयव' असून तो जन्माच्या क्षणापासून ते मृत्यूच्या क्षणापर्यंत अखंडपणे अनुभव घेत घेत शिकतच असतो असे आता पक्के मानले जाते. मेंदूच्या स्वतःच्या शिकण्याच्या नैसर्गिक प्रक्रियांना अनुसरून मुलांचे शिक्षण झाले तर पूर्णांशाने नि प्रभावी रीतीने नि आनंदाने होते असे आता मानले जाते. यातून 'मेंदूआधारित शिक्षणा'ची संकल्पना दृढ होत आहे.

संगणकासारख्या तंत्रज्ञानात वेगाने सुधारणा व त्यांचा व्यापक उपयोग सर्वच शास्त्रांच्या संशोधनव्यवहारांत वेगाने होत गेला. (त्यातून 'कृत्रिम बुद्धिमत्ते'चे स्वतंत्र शास्त्रही तयार झाले!) अनेक प्रामुख्याने सामाजिक शास्त्रांच्या क्षेत्रांत अनेक अंगांनी 'माणूस शिकतो कसा' याचा शोध अलीकडच्या काळात घेतला जाऊन, त्यांतून, शिकण्याचे, जग समजावून घेण्याचे, आकलनाचे नवे शास्त्र आज उदयाला आले आहे. त्याला आकलनशास्त्र असेच म्हणतात. शालेय पातळीवर आता 'मूल शिकते कसे', त्याच्या शिकण्याच्या नैसर्गिक प्रक्रिया कसकशा असतात, बौद्धिक कार्यात भावनेचे स्थान काय असते, मूल आपल्या पूर्वानुभवांना जोडून स्वतःच्या ज्ञानाची रचना स्वतः कसकशी करीत जाते, शिकण्यात भाषेचे स्थान व महत्त्व काय असते. पहिली भाषा मानवी मनावर कशी कोरली जाते. तीच माणसाच्या विचार प्रक्रियेचे कल्पनाशक्तीचे साधन कशी बनते, आव्हानात्मक शिकण्याची प्रक्रिया ही मूलतः आनंदमय प्रक्रिया कशी असते, मेंदूप्रणित शिक्षणात कशाकशाने अडथळे निर्माण होतात या व अशा कितीतरी गोष्टी आपल्याला कळू लागल्या आहेत. या सगळया नव्या 'ज्ञाना'ला बरोबर घेऊनच आपण शिक्षणाला नवीन आकार देत आहोत. यालाच आजच्या शैक्षणिक परिभाषेत 'रचनावादी' अथवा 'ज्ञानरचनावादी' शिक्षण म्हणून संबोधले जाते. शकणार आहोत. पर्यायी शिक्षणरचना यांतूनच साकार होणार आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

नव्या पिढ्यांना नव्या जगासाठी सक्षम करण्याचे काम हेच जर शिक्षणाचे अंगभूत कार्य असेल तर त्यासाठी आपल्याला त्वरेने या 'नव्या शिक्षणा'कडे वळावे लागणार आहे. सुदैवाने, राजकीय निर्णय ह्या दिशेने वळण घेऊ लागलेले आहेत. शिक्षणात होऊ घातलेले हे नवे बदल स्वीकारले जाण्याची आणि शिक्षणसंस्थांमधून, त्यांच्या वर्गावर्गांतून हे शिक्षणबदल अंमलात येण्याची गरज आहे.

नव्या शिक्षणाकडे वाटचाल होण्याची काही सुचिन्हेही दिसू लागली आहेत. मला ती अधिकाधिक आशावादी आणि आनंदी करताहेत.

❖